महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०२ वा | दिनांक : ३०/०९/२०२५ | वार : मंगळवार

## असदुद्दीन ओवैसींचा ध्रुवीकरणाचा अजेंडा : आमदार सतेज पाटील



**कोल्हापूर :** एमआयएमचे अध्यक्ष आणि खासदार असदुद्दीन ओवैसी आज, २९ सप्टेंबर रोजी कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून, त्यांच्या या दौऱ्याला हिंदुत्ववादी संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. ओवैसी हे भडकाऊ भाषणे करतात, त्यामुळे ऐन नवरात्र उत्सवाच्या काळात त्यांच्या कोणत्याही कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशी मागणी या संघटनांनी केली आहे.

असदुद्दीन ओवैसींच्या या दौऱ्यात कोल्हापुरातील बागल चौकात एमआयएमच्या नवीन पक्ष कार्यालयाचे उद्घाटन, पत्रकार परिषद आणि इचलकरंजी येथे जाहीर सभा होणार आहे. विरोधामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कोल्हापूर पोलिसांनी बागल चौकात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.

यावर काँग्रेसचे विधानपरिषदेचे गटनेते सतेज पाटील यांनी देखील आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, ओवैसी यांचा पहिल्यापासून ध्रुवीकरणाचा अजेंडा आहे. मात्र, कोल्हापूर ही शाहू महाराजांची भूमी आहे. त्यांचे हे ध्रुवीकरण इथे चालणार नाही. कोल्हापुरात एक चांगले वातावरण आहे. ते बिघडवण्याचे काम ओवैसींनी करु नये.

आमदार पाटील यांनी राज्य सरकारच्या महापुरग्रस्तांबाबत असलेल्या भूमिकेवरही टीका केली. ते म्हणाले, शेतकऱ्याला ज्या पद्धतीने मदत हवी आहे ती मिळत नाही. राज्य सरकारची उदासीनता असून केवळ कागदे नाचवणे सुरु आहे. सरकारने मदतीबाबत टाकलेल्या अटी रद्द करुन सरसकट शेतकऱ्याला न्याय दिला पाहिजे अशी मागणी सतेज पाटलांनी केली आहे.

दरम्यान, सतेज पाटील यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्तांना मदतीचा आवाहन केले होते. त्यानुसार जमा झालेली मदत मराठवाड्यातील पूरग्रस्तांच्याकडे आज पाठवण्यात आली. कसबा बावडा, भगवा चौक येथील, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर खासदार शाहू महाराज आणि आमदार सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मदतीची ही वाहने मराठवाड्याकडे रवाना झाली आहेत.

पुरामुळे जनजीवन उध्वस्त झालेल्या मराठवाड्याला मदत करण्यासाठी धान्यासह किराणा सामान, प्रथमोचार साहित्य, सॅनिटरी पॅडस, चप्पल, पाणी बॉटल्स, कपड्यांपासून ते ब्लँकेटस, चटईपर्यंत कोल्हापुरातील प्रत्येकान आपापल्या परीने खारीचा वाटा उचलला. यातून तब्बल २७ टेम्पो भरुन गोळा झालेली मदत सोमवारी खासदार शाहू छत्रपती आणि आमदार सतेज पाटील यांच्या उपस्थितीत मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्याकडे पाठवण्यात आली. कसबा बावडा येथील भगव्या चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन २५ टेम्पो मराठवाड्याकडे रवाना झाले.

## कोल्हापूर कुणाच्या लग्नामध्ये मिळालेले शहर नाही : इम्तियाज जलील



**कोल्हापूर :** एमआयएम पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्या प्रस्तावित कोल्हापूर दौऱ्याला हिंदुत्ववादी संघटनांकडून होत असलेल्या तीव्र विरोधाला छत्रपती संभाजीनगरचे एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. जलील यांनी कोल्हापूरमधील हिंदुत्ववादी संघटनांना स्पष्ट शब्दात बजावले की, हा देश कोणाच्या बापाची जाहगिरी नाही. कोल्हापूर म्हणजे कुणाच्या लग्नामध्ये मिळालेले शहर नाही. आम्ही कुठेही जाऊ शकतो.

कोल्हापूर शहरातील बागल कार्यालयात आज, २९ सप्टेंबर रोजी एमआयएम पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन होत आहे. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर हिंदुत्ववादी संघटनांनी तीव्र विरोध दर्शवल्यानंतर इम्तियाज जलील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ज्या खासदाराला पार्लमेंटमध्ये पुरस्कार मिळतो, त्याला कोण लोक सांगणार इथे यायचे नाही, असे म्हणत जलील यांनी ओवैसींचा बचाव केला. तसेच, अशा चिल्लर माणसांना आम्ही महत्त्व देत नाही, असा कडक इशाराही त्यांनी विरोधकांना दिला.

यावेळी इम्तियाज जलील यांनी भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांच्यावरही टीका केली. आज काय परिस्थिती आहे. केशव उपाध्ये यांना घाणेरडी सवय आहे. त्यांनी या ठिकाणी दोन दिवस येऊन राहावे, असे जलील म्हणाले. याचबरोबर, राजकीय पक्षांना त्यांनी विनंती केली की, अशा प्रकारची घाणेरडे वक्तव्य करू नका. महाराष्ट्रात सध्या पूर आणि अतिवृष्टीमुळे मदतकार्य सुरू असताना, मोठ्या मनाची लोकं त्यांची जबाबदारी पार पाडतील, असे म्हणत त्यांनी राजकीय नेत्यांनी अशा विधानांपासून दूर राहावे, असे आवाहन केले.

इम्तियाज जलील यांनी सोलापूर जिल्ह्यातील तिऱ्हे या पूरग्रस्त गावला भेट दिली. यावेळी ते म्हणाले, आमच्या पक्षाकडून पूरग्रस्त भागांत मदत केली जात आहे. सरकारकडून पूरग्रस्तांची जी अपेक्षा आहे, ती पूर्ण झालेली नाही. राज्याच्या पूरग्रस्त भगत मंत्र्यांचे दौरे आणि फोटोसेशन सुरू आहे, ते बंद करावेत, अशी सूचना देखील जलील यांनी यावेळी दिली आहे. सध्याच्या घडीला मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक जिल्ह्यांत गुगल मॅपच्या माध्यमातून पूरपरिस्थितीची पाहणी करावी. गुगल मीटिंगमध्ये निर्णय घ्यावा आणि शेतकऱ्यांना मदत करता येईल ते बघावे. पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे खूप हाल होत आहेत. सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात होतात. ही सर्वांसाठी लाजिरवाणी गोष्ट आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दसरा मेळावा बैठकीवर भाष्य करताना इम्तियाज जलील म्हणाले, गुवाहाटी येथून आणलेले पैसे दिले तर महाराष्ट्रातील पूरग्रस्तांचे प्रश्न एका मिनिटात संपवू शकतात. तिजोरीत ठेवलेले पैसे त्यांना काढायला सांगा, असे आवाहनही जलील यांनी केले आहे.

## वेळप्रसंगी निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करू : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर :** गत पन्नास वर्षात शेतकऱ्यांचे पावसामुळे जेवढे नुकसान झाले नसेल तेवढे नुकसान राज्यात सप्टेंबर अखेरपर्यंत झालेल्या पावसाने झाले आहे. मराठवाड्यासह राज्यातील अनेक भाग उध्वस्त झाले आहेत. राज्याच्या प्रत्येक भागात शासन शेताच्या बांधावर जाऊन पंचनामे करत आहे. या संकटातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळप्रसंगी ड्रोनच्या सहाय्याने व याचबरोबर प्रत्यक्ष पंचनाम्याच्या माध्यमातून अधिकाधिक मदत केली जाईल, असे सांगितले आहे. आम्ही वेळप्रसंगी निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करू, असे प्रतिपादन महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यात असलेल्या मौजा दाढेरा, तिडंगी, तेलगाव, नांदा गोमुख व जिल्ह्यातील इतर गावांतील कृषी क्षेत्राची त्यांनी पाहणी केली. या गावातील संत्रा, सोयाबीन, कापूस, तूर, भाजीपाला-वेलवर्गीय पिके उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर भेटून पालकमंत्री बावनकुळे यांनी धीर दिला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शासकीय यंत्रणेत पंचनाम्याप्रमाणे शेतकऱ्यापर्यंत मदत पोहचवली जाते. पंचनामे करताना कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश महसूल विभागाला दिले आहेत. या पंचनाम्यामध्ये काही चूक असल्यास ग्रामपंचायतीच्या माध्यमातून यात योग्य ती दुरुस्ती केली जाईल. कोणत्याही स्थितीत शेतकऱ्यांवर कसल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यात ऑगस्ट अखेरपर्यंत सूमारे २५ लाख व सप्टेंबर महिन्यात २२ लाख हेक्टर एवढे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. राज्यातील सर्व महसूल यंत्रणा शेताच्या बांधावर असून येत्या ५ ऑक्टोबर पर्यंत झालेल्या नुकसानीची आकडेवारी येईल. यानंतर मंत्री मंडळस्तरावर व्यापक विचार विनिमय करुन शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय जाहीर केला जाईल, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

आज शहरांमध्ये सिमेंटचे रस्ते झाल्याने शहरामध्ये पाणी साचते आहे. यादृष्टीने विचार करुन शहरात जल निस्सारण व मल निस्सारण आणि ग्रामीण भागामध्ये जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांच्या माध्यमातून मातीची धूप कमी व्हावी, पूराचा धोका कमी व्हावा यावर भर देणे आवश्यक असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५

## मनपा केंद्रीय प्रा. व मा. विद्यालय, मुकुंदवाडी येथे विद्यार्थ्यांची दंत तपासणी





**छत्रपती संभाजीनगर :** संत रोहिदास आरोग्य केंद्र, मुकुंदवाडी येथील दंतवैद्यकीय पथकाने मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून आवश्यक उपचार केले.

या प्रसंगी दंतवैद्यकीय पथकाने विद्यार्थ्यांना दातांची स्वच्छता, योग्य प्रकारे दात घासण्याची पद्धत, दातांचे आजार टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती देत जनजागृती केली.

हा आरोग्य उपक्रम मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांच्या नियंत्रणाखाली संपन्न झाला.

## मनपा केंद्रीय प्रा. व मा. विद्यालय, मुकुंदवाडी येथील विद्यार्थ्यांनी केले यश संपादन



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथील विद्यार्थ्यांनी टाटा सन्स प्रायव्हेट लिमिटेडतर्फे आयोजित "टाटा बिल्डिंग इंडिया स्कूल निबंध स्पर्धा" मध्ये यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

या वर्षीच्या स्पर्धेचा विषय "आत्मनिर्भर भारत" असा होता. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला व आपल्या कल्पना, विचार आणि स्वप्नांना निबंधातून सुंदरपणे मांडले.

विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत टाटा कंपनीने त्यांना पदक देवून गौरविले.

## वनिर्वाचित गटशिक्षणाधिकारी श्रीम.मोहम्मद सभाहत मईमोशद्दन मॅडम यांचा तालुका क्रीडा समितीच्या वतीने सत्कार




**कन्नड (कृष्णा शिंदे) :** नवनिर्वाचित गटशिक्षणाधिकारी श्रीम.मोहम्मद सभाहत मईमोशददन मॅडम यांचा तालुका क्रीडा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी तालुका क्रीडा समितीचे सदस्य तथा क्रीडा मार्गदर्शक प्रवीण शिंदे राष्ट्रवादी शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष अविनाश काळे सचिन भंडारी जि प प्रशाला अंधानेर शाळेचे मुख्याध्यापक जाधव सर






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५


## बौद्ध अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काबाबत गंभीर प्रश्न उपस्थित



**छत्रपती संभाजीनगर :** बौद्ध अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न बौद्ध अल्पसंख्यांक महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. परंतु या प्रवेश प्रक्रियेत शासनाने अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी ठरवून दिलेल्या नियम व आरक्षणाचे पालन न करता प्रवेश दिला जात असल्याचे गंभीर प्रकार समोर आले आहेत.या प्रकारामुळे बौद्ध अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हक्क बाधित होत असून, त्यांच्या न्याय्य हक्काकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर मा. प्र-कुलगुरूंना निवेदनाद्वारे पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत —1 विद्यापीठाशी संलग्न बौद्ध अल्पसंख्यांक महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया तातडीने तपासावी.2 बौद्ध अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना नियमानुसार प्रवेश मिळावा यासाठी योग्य पावले उचलावीत.3 भविष्यात नियमांचे उल्लंघन होऊ नये यासाठी संबंधित महाविद्यालयावर कडक देखरेख ठेवावी व आवश्यक ती कार्यवाही करावी.बौद्ध अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून याकडे विद्यापीठ प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलन मार्फत निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.यावेळी जिल्हा अध्यक्ष अक्रम खान, जिल्हा महासचिव संदीप तुपसंमुंद्रे,शारेंक काझी,भीमराव वाघमारे , भागवत चोपडे,

# उडचणी प्लॉट मधील महिलांचा नगरपरिषदेवर घागरीसह हल्लाबोल मोर्चा.....



**मुरुम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शहरातील यशवंतनगर परिसरातील उडचणे प्लॉट भागातील असंख्य महिलांनी सोमवारी (ता. २९) रोजी आपल्या जगण्याशी निगडित असंख्य समस्या घेऊन नगरपरिषदेवर हल्लाबोल मोर्चा काढला. सामाजिक कार्यकर्ते सिद्धलिंग हिरेमठ यांच्या नेतृत्वाखाली हलगीच्या निनादात घागरी हातात घेऊन निघालेल्या या मोर्चात परिसरातील रस्ते, शुद्ध पाणी, वीजपुरवठा, तुंबलेल्या गटारी, औषध फवारणी, तसेच उपलब्ध विजेच्या खांबांवर दिवे बसवावेत अशा प्रमुख मागण्या महिलांनी जोरदारपणे मांडल्या.

मोर्चा नगरपरिषद कार्यालयावर दाखल होताच महिलांनी आक्रमक पवित्रा घेत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पाठिंबा दर्शविला. यावेळी महिलांनी संतप्त स्वरात सांगितले की, आम्ही दिवसभर शेतीकाम करून कुटुंबाचा गाडा चालवतो.

एक दिवस मजुरी नाही केली तर कुटुंब उपाशी राहते. अशा परिस्थितीत शुद्ध पाणी, रस्ते, वीज अशा प्राथमिक सोयीही मिळत नसल्याने जगण्याची लढाई अधिक कठीण होत आहे. अनेकदा तक्रारी केल्या तरी आज-उद्या काम करू असे सांगून आम्हाला उडवा-उडवी ची उत्तरे दिली जातात परंतु प्रत्यक्षात काहीही काम होत नाही. दरम्यान, नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक विशाल अमृतराव यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, उडचणे प्लॉटचा मागील लोकवस्ती भाग नगरपरिषदेच्या हद्दीत नसला तरी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पाहणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अहवाल मिळाल्यानंतर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील. यावेळी सुद्यान हिप्परगे, सुलताना शेख, मंगल जाधव, विजया कुंभार, रुकिया कारभारी, शाहीन पाटोदे, बानुबी पटेल, वाशिमा मासूलदार सारिका बोळे, फातिमा महाबुसे, आसमा शेख, नजबुलबी शेख, उषाबाई आळंगे, अश्विनी मडोळे, सुजाता सूर्यवंशी, शफिका शेख, सोनाबाई सुरवसे, असलम महाबुसे, तेजस शिंदे, बालाजी माने, कन्हैया भोकले, अमोल कदम, गुंडू माने, बाळू वाघमारे, हणमंत मांडले, अंकुश वाळके, गिरजाप्पा शिंदे, शिवाजी जाधव, राम कांबळे, सुरेश गायकवाड आदि असंख्य नागरिक उपस्थित होते.

या भागातील अडचणी गंभीर असून नागरिकांचा संताप वाढला आहे. नगरपरिषदेकडून तात्काळ अंमलबजावणी न झाल्यास येत्या काळात त्यापेक्षा तीव्र आंदोलन उभारले जाईल.

## वरिष्ठ व निवड श्रेणी मंजुरीसाठी विशेष शिबीर आयोजित करा



**पुणे :** वरिष्ठ व निवड श्रेणी प्रस्ताव मंजुरीसाठी व प्रमाणित करण्यासाठी तात्काळ विशेष शिबिर आयोजन करावे यासाठी आज दिनांक 29 सप्टेंबर २०२५ निवेदन देण्यात आले.

मागील काही महिन्यापुर्वी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे यांनी वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षण आयोजित केलेले होते.

हजारोंच्या संख्येने प्रशिक्षणार्थी शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. ज्यांना हे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे त्यांना त्वरीत वेतनश्रेणी लागू करण्यात यावी यासाठी भाई चंद्रकांत चव्हाण (जिल्हा सचिव) यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे पदाधिकारी महानगर सचिव नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे विनोद केनेकर, डॉ. पद्माकर पगार, विलास चव्हाण, संतोष सुरडकर, कृष्णा गोंडे, दिपक वाघ, रावसाहेब बोरसे, अजित जाधव, अरुणा चौधरी, शितल कवडे, स्वाती बोंडे, रेखा साकळे सोनाली गव्हाणे हे सर्व मराठवाडा शिक्षक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५

## इयत्ता बारावीच्या परीक्षा अर्ज भरण्याची मुदत वाढवून देण्याची शिक्षण मंत्र्यांकडे मागणी

**जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे)** : मराठवाड्यात व महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे, विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ न मिळाल्यामुळे,इयत्ता बारावी उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा परीक्षा अर्ज भरण्याची मुदत वाढ देण्यात यावी याबाबतचे निवेदन शालेय शिक्षण मंत्री नामदार दादा भुसे यांना एका पत्रान्वये जालन्यातील शिक्षण प्रेमी नागरिकांनी केले आहे.

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळाला नाही, गेल्या आठवड्यापासून शाळा~ महाविद्यालयात जाता आले नाही.

बऱ्याच विद्यार्थ्यां जवळ इयत्ता बारावीच्या परीक्षेचे शुल्क भरण्यास पैसे नाहीत. ग्रामीण व शहरी पालकांची अत्यंत दैनय अवस्था झाली आहे अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफ करून त्यांना परीक्षा अर्ज भरण्याची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी जालन्यातील शिक्षणप्रेमी मंडळी तसेच जेष्ठ नागरिक मंचाचे जालना जिल्ह्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री ज्ञानदेवराव पायगवाने यांनी एका पत्रान्वये केलेली आहे.

# कला व बुद्धी यांचा सृजनात्मक संगम म्हणजे चित्रपट महोत्सव



डावीकडून डॉ. सविता मनोहर, मानसशास्त्र विभागप्रमुख प्रो. डॉ. रजनी सेनाड, माजी प्राचार्य डॉ. वसुधा पुरोहित, प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, संस्थेच्या अध्यक्ष डॉ. कल्पलता पाटील - भारस्वाडकर मॅडम, संस्थेचे सचिव डॉ. डी. एस. कुलकर्णी व डॉ. अंजली पंडित

**छत्रपती संभाजीनगर** : डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात दि. 27 सप्टेंबर व 29 सप्टेंबर 2025 रोजी मानसशास्त्र विभागातर्फे चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला होता. चित्रपट महोत्सवाचे हे पाचवे वर्ष होते. दरवर्षी मानसशास्त्रीय संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांना चित्रपट दाखविले जातात, व त्यावर समूहचर्चा अशी वैचारिक मंथन घडवून आणले जाते. चांगले विचार, संस्कार चित्रपटाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावेत हा या चित्रपट महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

या महोत्सवाची यावर्षीची संकल्पना cloud of emotion - skies of hope ही होती. भावना आणि ताण या एकमेकांशी निगडित असतात.

मानवी जीवन हे या भावना आणि ताणाभोवती सातत्याने फिरत असते. हे दोन्ही घटक अटळ आणि अविभाज्य असे आहेत. भावना या ताण निर्माण ही करू शकतात आणि ताण विरहित देखील करू शकतात. अशा या भावनांचे व्यवस्थापन कसे करायचे? याचे ज्ञान यावर्षीच्या सायलेंट टाईज, घालमेल, मळभ, नाव काय तुझं, लव्ह बाय चान्स या लघु चित्रपटा द्वारे देण्यात आले.

दिनांक 27 सप्टेंबरला चित्रपट महोत्सवाचे उद्धाटन एम. एल. अँड जी. इ. सोसायटीच्या अध्यक्षा एडवोकेट डॉ. कल्पलता पाटील भारस्वाडकर यांच्या हस्ते व्हिडिओ द्वारे करण्यात आले. उद्धाटनाच्या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. अध्यक्षांचा परिचय डॉक्युमेंटरीद्वारे डॉ. सविता मनोहर यांनी केला. गेल्या चार वर्षांच्या चित्रपट महोत्सवाच्या थीम चा आढावा प्रास्ताविकेतून डॉक्युमेंटरी द्वारे मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ.रजनी सेनाड यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य डॉ. वसुधा पुरोहित यांनी अशा चित्रपट महोत्सवाचे आयोजन ही काळाची गरज आहे असे मत प्रतिपादन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई यांनी लघुपटाद्वारे आपल्याला कमी वेळात उत्तम विचारांचे धन मिळते अशी भूमिका मांडली. चित्रपट महोत्सवाच्या अध्यक्ष आणि उद्धाटक आदरणीय डॉ. कल्पलता पाटील

भरस्वाडकर मॅडम यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात स्व आदर,स्व आत्मविश्वास, स्व भान यांसारखी जीवनमूल्य ही चित्रपटांसारख्या प्रभावी माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत अतिशय उत्तम रीतीने पोहोचवली जातात असे विचार मांडले.

या उद्धाटन प्रसंगी संस्थेचे सचिव एडवोकेट डी.एस. कुलकर्णी सर, अध्यक्ष एडवोकेट कल्पलता पाटील भारस्वाडकर,माजी प्राचार्य डॉ. वसुधा पुरोहित,प्रभारी प्राचार्य डॉ. सुनीता बाजपेयी, विभाग प्रमुख डॉ.रजनी सेनाड,प्रा. डॉ.अंजली पंडित आणि प्रा. डॉ.सविता मनोहर उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु.वेदिका खरे हिने केले. तर आभार प्रकटन विभाग प्रमुख डॉ. रजनी सेनाड यांनी केले. उद्धाटनाच्या सोहळ्याच्या शेवटी राष्ट्रगीत व त्यानंतर विद्यार्थिनींना चित्रपट दाखविण्यात आले.

दि.29 सप्टेंबर रोजी, चित्रपट महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी लघु चित्रपट दाखवण्यात आले व विद्यार्थिनींचे व प्राध्यापकांचे समूह तयार करून त्या समूहाला विचार, भावना, आशा, धैर्य अशी नावे देण्यात आली व व समूह चर्चा करण्यात आली. या समूह चर्चेतून जीवनात येणाऱ्या आजारांमुळे, संकटांमुळे, अनपेक्षित येणाऱ्या घटनांमुळे जी भावनिक आंदोलने निर्माण होतात त्या आंदोलनातून सकारात्मकता शोधून स्वतःतील आंतरिक शक्ती शोधणे गरजेचे असते, म्हणजेच भावनिक ताण हा भावनिक शक्तीकडे संक्रमित करायचा असतो हा सूर गवसला.

या चित्रपट महोत्सवा अंतर्गत इमोशनल स्ट्रेस इमोशनल स्ट्रेंथ भावनिक ताण -भावनिक संघर्ष या संकल्पनेवर आधारित रील मेकिंग स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेमध्ये एसबीईएस कॉलेज, दगडूजीराव देशमुख कॉलेज विवेकानंद महाविद्यालय, MIT कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई यांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सविता मनोहर यांनी केले तर आभार प्रकटन डॉ. अंजली पंडित यांनी केले दोन दिवसीय चित्रपट महोत्सवात विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग, भरघोस प्रतिसाद लाभला.या चित्रपट महोत्सवाचे आयोजन

सूत्रबद्ध नियोजन विभाग प्रमुख प्रो.डॉ.रजनी सेनाड यांनी केले.




## अपघातात जखमी झालेल्या इसमाचे निधन

**दौलताबाद (जावेद अहेमद)** : अपघातात जखमी झालेल्या इसमाचे निधन दौलताबाद हद्दीत दि गंगाधर काशिनाथ पवार वय अंदाजे ५० ते ५५ वर्ष हा जखमी अवस्थेत दि २५ रोजी मिळून आला होता.

त्याला उपचारासाठी घाटी रुग्णल्यात १०८ रुग्णवाहिकेने दाखल करण्यात आले होते उपचारा दरम्यान त्याचे दि २८ रविवारी निधन झाले आहे.

त्याचे गाव नातेवाईक यांची ओळख पटवण्यासाठी दौलताबाद पोलिसांनी संपर्क करण्याचे आव्हान केले आहे वर्णन नाव गंगाधर काशिनाथ पवार वय ५०ते ५५ वर्ष रंग सावळा, चेहरा लांबट,उंची पाच फूट पाच इंच,केस काळे दाढी काळी,बांधा मध्यम, सोबत काही नाही



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५


## जागर कवितेचा राज्यस्तरीय कवयित्री संमेलनाचे आयोजन



जयश्री वाघ



गीता भावसार

**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी हुसे)** : त्रैमासिक तिफण, तिफण डिजिटल , भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद यांच्या वतीने दरवर्षी नवरात्री निमित्त समस्त मातृशक्तिला वंदन करणारा जागर कवितेचा हे महाराष्ट्रातील निमंत्रित व नामवंत कवयित्रीचे संमेलन आयोजित करण्यात येते.

हे आयोजनाचे पाचवे वर्ष असून या वर्षी सायंकाळी ७ वा. (ता. ३० ) होणाऱ्या कवयित्री संमेलनाच्या अध्यक्षपदी नाशिक येथील कवयित्री व गझलकार जयश्री वाघ यांची निवड करण्यात आली. जयश्री वाघ या जलसंपदा विभागात नोकरी करतात. उत्तम निवेदक, कवयित्री आणि गझलकार म्हणून त्या सुपरिचीत आहेत. नीलमोहर हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध असून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

या संमेलनाचे उदघाटन पुणे येथील सुप्रसिद्ध कवयित्री गीता भावसार यांच्या हस्ते होणार आहे. गीता भावसार या शिक्षणाने सॉप्टवेअर इंजिनियर असून नामवंत कवयित्री व प्राध्यापिका आहेत. काव्यलेखना बरोबरच चित्र व छायाचित्र हा त्यांच्या आवडीचा प्रांत आहे. त्यांना महत्वाचे पुरस्कार व सन्मान मिळालेले आहेत. या जागर कवितेचा संमेलनात महाराष्ट्रातील नामवंत कवयित्री मंदा नांदूरकर (अमरावती ), जयश्री काळवीट (भुसावळ ), मंगल सांगळे (सिन्नर ), रेखा ढेरे (बीड ), ज्योती वाघ (जळगाव ), संगीता अरबुने ( वसई ), शितल संखे (पालघर ) अंजली दिक्षित, क्षमा बर्डे (छत्रपती संभाजीनगर ) यांना निमंत्रित करण्यात आले आहे. नवरात्रीच्या निमित्ताने होणाऱ्या कवयित्री संमेलनाच्या माध्यमातून यापूर्वी अनेक कवयित्रींनी सहभाग नोंदवला आहे.

या कार्यक्रमाचे निमंत्रक कवयित्री व लेखिका ज्योती सोनवणे आहेत. या ऑनलाईन कवयित्री संमेलनात सहभागी व्हावे ,असे आवाहन संयोजक तिफणकार डॉ. शिवाजी हुसे व भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे यांनी केले आहे.

**दै. महाराष्ट्र जनशक्ती आणि Mj News साठी, बीड, आष्टी, केज, अंबाजोगाई, धारूर, शिरूर कासार, गेवराई, चौसाला, पाटोदा, कडा, आष्टी, वडवणी, बनसारोळा, येथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी दुपारी १२ ते रात्री दहा वाजेपर्यंत ७५८८००५००२ या नंबरवर संपर्क साधावा**

## सावता माळी महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाची राष्ट्रीय परिषद संपन्न



**फुलंब्री (प्रतिनिधी)** : प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (PM-USHA) अर्थसहाय्याने श्री. संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रंगारी व विवेकानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने "बदलत्या जागतिक संदर्भात, भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण" या विषयावर सामंजस्य कराराअंतर्गत एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

या राष्ट्रीय परिषदेचे उदघाटन शासकीय कला आणि पदव्युत्तर महिला महाविद्यालय, हैद्राबाद, तेलंगना येथील प्रोफेसर डॉ. प्रसन्ना खडकीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील प्राचार्य, डॉ. दादाराव शेंगुळे तसेच मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष, प्रोफे. डॉ. विलास खंदारे उपस्थित राहीले. तर अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, मा. श्री निवृत्ती पा. गावंडे उपस्थित राहीले.याप्रसंगी परिषदेचे प्रास्ताविक प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केले.

तर राष्ट्रीय परिषदेची भूमिका प्रोफे. विलास खंदारे व प्राचार्य, डॉ. दादाराव शेंगुळे यांनी मांडली. प्रस्तुत राष्ट्रीय परिषदेच्या उदघाटन प्रसंगी बोलत असतांना डॉ. प्रसन्ना खडकीकर म्हणाले की, देशादेशांतर्गत जे सद्यस्थितीला वादविवाद सुरु आहेत, त्यांचे वेगवेगळे असे विषय आहेत. याचा आज भारतावर परिणाम होताना दिसत आहे. बऱ्याचशा कंपन्या भारतात आलेल्या आहेत. व काही कौशल्याधिष्टीत मनुष्यबळ आपल्याकडून दुसरीकडे जाताना दिसते. कारण दुसऱ्या देशात या कौशल्याधिष्टीत माणसांमुळे तेथील आर्थिक परिस्थिती सुधारताना दिसते. व यातून आंतरराष्ट्रीय व्यापार सुधारतो.

परंतु आज आंतरराष्ट्रीय तणाव वाढताना आढळून येत आहे. याचा सर्वच बाबींवर परिणाम होत आहे. यासोबतच भारतीय अर्थकारणाचा परिणाम याबाबत उपस्थितांना टेरिफ, जीएसटी, आयात - निर्यात या घटकांच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव, मा. श्री निवृत्ती पा. गावंडे यांनी केला.तर उदघाटन सत्रासाठी उपस्थित मान्यवरांचे आभार समन्वयक प्रोफेसर, डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मानले. तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर व प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर यांनी केले.परिषदेच्या दुसऱ्या सत्रात गटचर्चा आयोजित करण्यात आली.

या सत्राचे समन्वयक म्हणून डॉ. दीक्षित यांनी जबाबदारी सांभाळली. यात डॉ. नचिकेत सूर्यवंशी, डॉ. किशोर कदम, डॉ. पी. आर. मुठे यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारासंदर्भात जागतिक बाजारपेठेतील व्यापार व उद्योग, मीडिया, चलन या विषयाच्या अनुषंगाने चर्चा घडवून आणली. या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी केला. तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. नितीन माळेगावकर यांनी मानले.परिषदेच्या तिसऱ्या सत्रात उपस्थित संशोधक व अभ्यासकांनी पेपर वाचन केले. सत्र समन्वयक म्हणून प्रा. सुनील गोर्डे यांनी जबाबदारी सांभाळली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, संभाजी काळे यांनी केला.समारोप सत्रात आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रंगारी येथील प्राचार्य, डॉ. नवनाथ आघाव म्हणाले की, अर्थशास्त्राचा परिणाम हा मानवाच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत आहे.

त्यामुळे अर्थशास्त्रीय बदलत्या चक्राचा परिणाम मानवावर होत असतो. हे तितकेच खरे आहे. काळ ह बदलत्या परिस्थितीचा द्योतक असतो. म्हणजे अर्थशास्त्रीय बदलामुळे आज जागतिक ढवळाढवळ होताना दिसून येत आहे. तसेच अमेरिकेचा संदर्भ देताना म्हणाले की, अमिकेचे अर्थकारण हे अशिया खंडातील छोट्या छोट्या घटकांवर अवलंबून आहे हे अमेरिकेने विसरू नये. असे मत व्यक्त केले.

या सत्राचा समारोप संस्थेचे संचालक डॉ. सर्जेराव ठोंबरे म्हणाले की, आर्थिक राष्ट्रवाद सद्या संपूर्ण जगतात जोर धरत आहे. आणि प्रत्येक राष्ट्राला आपापले अस्तित्व सिद्ध करायचे आहे. त्यामुळे सद्या वादविवाद होताना दिसत आहेत. तसेच आयातीपेक्षा निर्यात वाढली पाहिजे. असे मत व्यक्त केले.यावेळी उपस्थित प्राचार्य, दिनकरराव टकले तसेच उपस्थित सर्व मान्यवर, अभ्यासक, संशोधक यांचे आभार प्रा. डॉ. धैर्यशील सोळुंके यांनी मानले. यावेळी तीनही महाविद्यालयातील प्राध्यापक अभ्यासक, संशोधक परिषदेसाठी पूर्णवेळ उपस्थित राहिले.

## बारावीच्या विद्यार्थ्यांना पूर स्थितीमुळे परीक्षा अर्ज भरण्यास २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**मुंबई** : राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टी आणि त्यामुळे मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगरसह इतर भागांमध्ये निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमुळे बारावी बोर्डाच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी राज्य परीक्षा मंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

आता बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

बारावी परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२५ होती. मात्र, पूरग्रस्त भागातील अनेक विद्यार्थी आणि पालकांनी अर्ज भरण्यास मुदतवाढ मिळावी यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे विनंती केली होती. या विनंतीची तातडीने दखल घेत एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनी करून या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत योग्य निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानंतर शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी तात्काळ राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी संपर्क साधला आणि अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, शिक्षण विभागाने बारावीच्या नियमित विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्याची मुदत २० ऑक्टोबर पर्यंत वाढवली आहे. यासंदर्भात शिक्षण विभागामार्फत लवकरच परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

यासोबतच, बाह्य पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्याची मुदत १५ ऑक्टोबर पर्यंत, तर नवीन परीक्षा केंद्रांसाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत १० ऑक्टोबर पर्यंत वाढवण्यात आली आहे. या निर्णयामुळे पूर आणि अतिवृष्टीमुळे त्रस्त झालेल्या हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५


# अरे पावसा

अरे पावसा..
दर वर्षी मिरगात
शेतशिवार वाट पाहत असतं
सर्जाराजा सोबत बळीराजाला घेऊन..

तर तू येत नाहीस वेळेवर
म्हणून युगानुयुगापासून
रक्त अन घाम ओतून
केलेली पेरणी वाया जात असते..

तरी काळी माय पोसत असते
माझ्या कुणबी बापाला..
तुझ्या रिमझिम थेंबावर ही..

पण आता कहर केलास पावसा
हिरव्या पिकासोबत..
जीवनदायीनी माती ही घेऊन गेलास..

पाठीवर तर मारत असतोच तू दर वर्षी..
आता पोटावर मारून गेलास..

जगण्याच्या वाटा
आधीच अडवल्या बळीराजाच्या
अनमोल पिकाला मातीमोल भाव देऊन व्यवस्थेने..
त्यात तू कहर केलास..

आता ठेवायचा कोणावर भरोसा..
सांग तू पावसा ..

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**

# आजच्या तरुणांनी शहीद भगतसिंगाच्या देशभक्तीचा आदर्श ठेवावा : प्रा.सोमेश्वर मोगरे




**कन्नड :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन ,मुंबई व राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) "स्वच्छता ही सेवा" अभियान-2025 अंतर्गत दिनांक 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोंबर 2025 पर्यंत शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येत आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून आज शहीद भगतसिंग यांच्या जयंती निमित्त अर्थशास्त्र विभागाचे प्रा. सोमेश्वर मोगरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्यांनी "आजच्या तरुणांनी शहीद भगतसिंगाच्या देशभक्तीचा आदर्श ठेवावा" असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. आर. के.पवार,डॉ. आर.एम.घोती व इतर सहकारी उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन डॉ. राकेश अहिरराव डॉ. सीमा काशीद व रासेयो चे स्वयंसेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# छंद

प्रत्येकाला असावा
एक तरी छंद
छंदातून मिळतो
जगण्यात आनंद

कवितेचा छंद
वाढवी शब्दसाठा
मनातील भावनांना
मिळे नव्या वाटा

वाढते अभ्यासाची गोडी
वाचण्याच्या छंदामुळे
भाषा आणि संस्कृतीचे
तेव्हाच महत्व कळे

खेळण्याच्या छंदातून
सुदृढ होते तनमन
शरीर बळकट होवून
सदा निरामय जीवन

जीवनातील ताणतणावावर
छंद घालते आळा
येता हजारो संकटे
दु:खात सोसवी कळा

**रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता. महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५

# राष्ट्रीय प्रेम दिन : समाजातील एकतेची आणि सहकार्याची प्रेरणा

प्रेम हे मानवी जीवनाचे अत्यंत मौलिक आणि सर्वांगीण अंग आहे. मानवी समाजात प्रेमाची भूमिका फक्त व्यक्तीगत नात्यांपुरती मर्यादित नसून, ती सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक आणि भावनिक स्तरावरही अत्यंत महत्त्वाची ठरते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, प्रेम केवळ भावना नसून, समाजातील एकता, सहकार्य, सहिष्णुता आणि समजूतदारपणाचा पाया घालणारे साधन आहे. व्यक्तींमधील परस्पर प्रेम, आदर आणि स्नेह हे नातेसंबंध दृढ करतात, समाजात सामाजिक स्थैर्य निर्माण करतात आणि मनुष्य समाजातील विविध गटांमधील भेदभाव कमी करतात.

राष्ट्रीय प्रेम दिन (National Love People Day) हा दिवस दरवर्षी ३० सप्टेंबरला साजरा केला जातो. या दिवसाची सुरुवात २०१७ मध्ये शिकागोमधील लाइफलाइन चर्चने केली. या दिवसाचा उद्देश सर्व मानवतेला प्रेम देण्याचे, निःस्वार्थपणे एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचे आणि समाजातील एकतेचा संदेश देण्याचे आहे. हा दिवस कोणत्याही व्यक्ती किंवा गटासाठी मर्यादित नसून, सर्व मानवतेसाठी समान रूपाने लागू होतो. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, हा दिवस लोकांमध्ये सामाजिक संवेदनशीलता वाढविण्यासाठी, सहकार्याचा प्रसार करण्यासाठी आणि सामाजिक एकतेला बळकटी देण्यासाठी एक प्रभावी साधन आहे.

प्रेमाची समाजशास्त्रीय व्याख्या केल्यास, ती केवळ भावना नसून, ती एक सामाजिक क्रिया आहे जी व्यक्तीला इतरांशी जोडते. व्यक्तीच्या मानसिक आणि भावनिक स्वास्थ्यासाठी प्रेम महत्त्वाचे आहे. प्रेमामुळे मनोवैज्ञानिक स्थैर्य मिळते, मानसिक तणाव कमी होतो आणि जीवनातील सकारात्मक ऊर्जा वाढते. समाजशास्त्रज्ञांच्या मते, प्रेम हा समाजातील नातेवाईक संबंध, मित्रत्व, रोमँटिक नातेसंबंध आणि समुदायातील सहकार्य यांचा आधार आहे. प्रेमामुळे व्यक्ती केवळ स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठीही कार्यशील बनते.

राष्ट्रीय प्रेम दिनाच्या उपक्रमांमध्ये लोक एकमेकांना मदत करणे, समाजातील दुर्बल घटकांसाठी योगदान देणे, कला, संगीत, साहित्य आणि सर्जनशील माध्यमातून प्रेम व्यक्त करणे, तसेच आपल्या नात्यांमध्ये सौहार्द निर्माण करणे यांचा समावेश असतो. या दिवशी समाजातील लोक एकत्र येऊन प्रेमाच्या शक्तीचा अनुभव घेतात आणि त्याचा प्रसार करतात. शाळा, महाविद्यालये, सामुदायिक संस्था आणि कार्यकारी संघटनांमध्ये या दिवशी विशेष उपक्रम राबवले जातात, जिथे लोकांना एकमेकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याची संधी मिळते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, असे उपक्रम व्यक्तीमध्ये सहकार्याची भावना निर्माण करतात, समुदायात सामाजिक एकता वृद्धिंगत करतात आणि समाजातील भेदभाव कमी करतात.

प्रेमाचे विविध प्रकार आहेत त्यामध्ये कौटुंबिक प्रेम, मैत्रीचे प्रेम, रोमँटिक प्रेम, निःस्वार्थ समाजसेवेतील प्रेम आणि सार्वभौमिक प्रेम. प्रत्येक प्रकार समाजाच्या वेगवेगळ्या स्तरावर कार्य करतो. कौटुंबिक प्रेम घरगुती स्थैर्य निर्माण करते, मैत्रीचे प्रेम सामाजिक नेटवर्क बळकट करते, रोमँटिक प्रेम भावनिक संतुलन साधते, तर समाजासाठी केलेले निःस्वार्थ प्रेम समाजात मानवतेचा प्रसार करते. ३० सप्टेंबर रोजी साजरा होत असलेला राष्ट्रीय प्रेम दिन हा दिवस या सर्व प्रकारच्या प्रेमाला समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून उजाळा देतो, ज्यामुळे समाज अधिक संवेदनशील, सहानुभूतिशील आणि सहकारी बनतो.

समाजातील बदलत्या मूल्यांमुळे आधुनिक काळात प्रेमाच्या अभिव्यक्तीमध्ये आणि नातेसंबंधांमध्ये बदल होत आहेत. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे संवादाच्या मार्गांमध्ये बदल झाला आहे, लोक ऑनलाइन माध्यमातून एकमेकांशी जोडले जात आहेत, परंतु प्रत्यक्ष संवादाचा अभाव काही वेळा भावनिक एकरूपतेसाठी अडथळा ठरतो. अशा परिस्थितीत राष्ट्रीय प्रेम दिन हा दिवस लोकांना प्रत्यक्ष संवाद साधून प्रेम व्यक्त करण्याची संधी देतो. हा दिवस लोकांना आपल्या भावनांना ओळखण्याची, व्यक्त करण्याची आणि इतरांशी जोडण्याची जागरूकता निर्माण करतो.

प्रेम हा सामाजिक बदल घडविण्याचेही माध्यम आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, जेव्हा व्यक्ती एकमेकांशी प्रेमळ आणि आदरयुक्त वागतात, तेव्हा समाजातील हिंसा, असहिष्णुता आणि सामाजिक ताण-तणाव कमी होतो. प्रेमामुळे लोकांमध्ये एकमेकांच्या दृष्टिकोनाची समज निर्माण होते, मतभेदांचे सौम्य समाधान शक्य होते आणि सामाजिक सहकार्य अधिक दृढ होते. राष्ट्रीय प्रेम दिनाच्या उपक्रमांमुळे समाजातील व्यक्तींमध्ये या गुणांचा प्रसार होतो आणि समुदाय अधिक सकारात्मक व सहकार्यशील बनतो.

या दिवशी शाळा, महाविद्यालये, कार्यालये, समुदाय केंद्रे आणि सामाजिक संस्थांमध्ये विशेष कार्यशाळा, चर्चा, कला प्रदर्शन, नाटक आणि संगीत कार्यक्रम आयोजित केले जातात, जे प्रेमाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकतात. सामाजिक दृष्टिकोनातून, हे उपक्रम लोकांना आपले नातेवाईक, मित्र, सहकारी, आणि समुदायातील इतर सदस्य यांच्याशी प्रेमळ संवाद साधण्याची संधी देतात. समाजशास्त्रज्ञांचे मत आहे की, अशा सामूहिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक मूल्यांचा प्रसार होतो, नकारात्मक भावनांचे प्रभाव कमी होतात, आणि सामाजिक सहकार्य व एकात्मता वाढते.

प्रेमाचे समाजातील स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, प्रेम फक्त वैयक्तिक समाधानापुरते मर्यादित नाही, तर ते सामाजिक आरोग्य आणि समाजाची स्थैर्य सुनिश्चित करण्याचे साधन आहे. प्रेमामुळे लोकांमध्ये सामाजिक बांधिलकी वाढते, एकमेकांच्या समस्यांकडे संवेदनशील दृष्टिकोन विकसित होतो, आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी सहकार्य करण्याची वृत्ती निर्माण होते. राष्ट्रीय प्रेम दिन हा दिवस समाजात ही मूल्ये रुजवण्यास मदत करतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, राष्ट्रीय प्रेम दिन हा दिवस सामाजिक समानता, सहकार्य, सहिष्णुता, आणि मानवतेसाठी प्रेम व्यक्त करण्याचा एक महत्त्वपूर्ण सामाजिक संदेश पोहोचवतो. हा दिवस फक्त एक औपचारिक सण नाही तर तो समाजातील प्रत्येक व्यक्तीला प्रेमाच्या सामूहिक शक्तीचा अनुभव घेण्याची संधी देतो. समाजातील भिन्न गटांमध्ये प्रेमाचा प्रसार केल्याने, भेदभाव कमी होतो, सामाजिक एकता वाढते, आणि समाज अधिक सहिष्णु, संवेदनशील आणि सहयोगी बनतो.

अशा प्रकारे, राष्ट्रीय प्रेम दिन हा दिवस समाजातील सकारात्मक मूल्यांचा प्रसार करणारा, सामाजिक सहकार्य वृद्धिंगत करणारा आणि मानवतेच्या सार्वभौमिक संदेशाचा वाहक आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, हा दिवस प्रेमाच्या सामूहिक शक्तीला उजागर करण्यासाठी, व्यक्तींमध्ये सहानुभूती, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी वाढवण्यासाठी, तसेच समाजात एकता आणि सौहार्द निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या दिवशी प्रत्येक व्यक्तीने प्रेमाला केवळ भावना म्हणून न पाहता, एक सामाजिक क्रिया म्हणून स्वीकारले पाहिजे आणि त्याचा प्रसार करून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५

# धक्के भूकंपाचे.. ३१ वर्षांपूर्वीचे..

३०सप्टेंबर १९९३ ची काळ रात्र सरून पहाट ..साखर झोपेतील पहाटस्वप्नांना सुरुवात होते आहे...विघ्नहर्ता विसर्जीत करून भक्त गाढ झोपेत अन्..पहाटे३.५५ ला..एकदम विचित्र आवाज..जाग येते न येते तोच घरे कोसळण्याचा आवाज..दगड मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचे आक्रोश..विजेचे खांब कोसळले अंधार..काही दिसत नाही, सुचत नाही नुसती थरथर..पुन्हा एकामागून एक धक्के..जीव वाचवण्यासाठी दूर जायचे तर लाईट बंद आणि घरे रस्त्यावर कोसळल्याने रस्तेही बंद.. मोकळ्या जागेत,अंगणात थांबून अडकलेल्या माणसांचे वाचवा वाचवाच्या आर्त हाका..स्वप्नांच्या राख रांगोळीच्या पार्श्वभूमीवर सूर्योदय..६.५ रिश्टर स्केलचा धक्का बसला.

काही वेळाने प्रशासनाकडे बातम्या..शासन,प्रशासन, भारतीय सेनेचे जवान,स्वयंसेवी संस्था, यांच्या समन्वयातून अन्न, औषधे, तात्पुरता निवारा आदींचा तातडीने पुरवठा..मुख्यमंत्री मा .शरद पवार आणि मंत्रिमंडळ, आदरणीय शिवराज पाटील ,गृहमंत्री, भारत सरकार ,चैतन्यमूर्ती आदरणीय नगराध्यक्ष माधवराव पाटील काका, मा.आ.बसवराज पाटील, उस्मानाबाद जिल्ह्याचे माजी खासदार मा.रवींद्र गायकवाड उमरगा नगरीचे तत्कालीन अध्यक्ष मा.महादेवअप्पा दळगडे, प्रा.सुरेशराव बिराजदार या मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली मदत आणि पुनर्वसन मार्गी लागले.हॉटेल मालक संघ कोल्हापूरचे मा.उज्ज्वल नागेशकर आणि सहकारी यांनी संपूर्ण गावासाठी १५दिवस मोफत जेवणाची व्यवस्था केली.

नगर परिषद उमरगा,मुरूम YMCAमुंबई,मा. भास्करकुमार ,CASA,मुंबई,LWS कोलकताचे मा. पी. जे. चाको,राजेश, भारतीय जैन संघटना ,पुणे, मा.डॉ.नीलमताई गोऱ्हे,मा. विद्या बाळ,मुंबई,तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा अधिकारी मा.एस. चोक्कलिंगम,मुख्य कार्यकारी अधिकारी मा.राजीव जलोटा, विद्यमान मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव मा.भूषण गगराणी,पोलिस अधीक्षक मा.डॉ.के.व्यंकटेशम् डॉ.भूषणकुणार उपाध्याय, पोलिस अधिक्षक,लातूर, स्वामी नारायण संस्था, मुंबई, जनकल्याण समितीकडून मा.आ. सुजित ठाकूर,लातूरच्या युनिक सर्व्हिस ट्रस्टचे मा. विनायकराव पाटील,सोलापूरचे कॉ.नारायणराव आडम प्रबोधन केंद्र,माजी आमदार कॉ. आडम मास्टर,ऍड. एम. एच. शेख,स्पर्श मुंबईच्या मा.विपुला कादरी,मा.रमाकांत जोशी, मानवलोक,अंबाजोगाईचे डॉ.द्वारकदास बाबूजी लोहिया, शैलाभाभी लोहिया,उपेंद्र टण्णू,अंनिस, राष्ट्र सेवा दल,अंबाजोगाईचे नगराध्यक्ष दिवंगत अरूणराव पुजारी,निलग्यांचे डॉ.उत्तमराव तळीखेडकर, लोकमत सोलापूरचे मा.स.सो.खंडाळकर या मान्यवरांनी आम्हाला केलेली अनमोल मदत आज पुन्हा स्मरते आहे.

जनजीवन पूर्वपदावर येताच पक्के घरे,रस्ते, रुग्णालय, शंभर टक्के अनुदानावर माध्यमिक विद्यालय, खत, बी - बियाणे शेतीसाठी उसणवारीने दिले, वृक्षारोपण, जागतिक बँकेच्या सहाय्यातून महिला बहुउद्देशीय केंद्र स्थापना आदी सुविधांसह जगातील आदर्श पुनर्वसन...शासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून विविध प्रकल्प यशस्वी झाले. शासनातील बहुतांशी अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांनी उत्कृष्ट सेवा दिली तर काही संस्था, अधिकारी, राजकीय नेते आणि स्वयंसेवी संस्थांनी भूकंपग्रस्त भागातील लोकांच्या टाळूवरले लोणी खाण्याचा प्रयत्न केला.अशा स्वार्थी, भ्रष्टाचारी, संकोचलेल्या, बेईमान समाज, राज्य व्यवस्थेत देश-विदेश पातळीवरून बहुतांशी व्यक्तींनी, स्वयंसेवी संस्थांनी आणि अधिकाऱ्यांनी आपले दातृत्व अन् कर्तृत्व निस्वार्थपणे दाखवत प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडले.

यामुळे अजूनही सेवा,दान अन् इमान जपणारी माणसं जगात जिवंत असल्याचे अधोरेखित झाले.१)भूकंपग्रस्तांना शासकीय नोकरीत दिलेले तीन टक्के आरक्षण कमी करून दोन टक्के केल्याने भूकंपग्रस्त बेरोजगारांवर अन्याय होत असल्याची भावना आहे. आरक्षण पूर्ववत करून विशेष नोकर भरती मोहीम राबवण्याची मागणी होत आहे.२)धाराशिव ,लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त५२ गावात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून महिला बहुउद्देशीय केंद्रांच्या इमारतीची बांधणी करण्यात आली आणि त्या इमारती स्वयंसेवी संस्थांना देण्यात येऊन महिला बाल विकास कडून विभागाकडून प्रत्येक महिला केंद्राला दरवर्षी ४६४००/रुपये अनुदान दिले जाते.

अत्यंत कमी अनुदान आणि तेही वेळेवर दिले जात नसल्यामुळे दोन जिल्ह्यात मिळून फक्त नऊ महिला बहुउद्देशीय केंद्र सुरू आहेत. बाकीची बंद आहेत. नऊ महिला केंद्रांना सुद्धा दहा वर्षापासून महिला बाल विकास विभागाकडून अनुदान अप्राप्त आहे. सुरू असलेल्या महिला केंद्रांना थकीत अनुदान तसेच वाढीव अनुदान देऊन बंद असलेल्या महिला बहुउद्देशीय केंद्रांना पुनश्च सुरू करण्यात यावे अशी मागणी आहे.

३) भूकंपग्रस्त गावातील अंतर्गत रस्ते आणि इतर जन सुविधासाठी विशेष निधीची आवश्यकता असल्याने तो निधी देण्यासाठी संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या मंत्रालय स्तरावर बैठका होऊनही निधी अद्याप देण्यात आला नाही. जनसुविधेअंतर्गत विशेष निधी देण्यात यावा अशी मागणी आहे.४) भूकंपग्रस्त भागातील कुटुंबातील लोकांची वाढलेली संख्या लक्षात घेऊन उर्वरित खुले प्लॉट रीतसर शासनाची किंमत भरून देण्यात यावे अशी मागणी जिल्हाधिकारी साहेबांकडे करण्यात येत आहे.

पण याकडे साफ दुर्लक्ष करून स्थानिक ग्रामपंचायती मधील पदाधिकारी शासकीय जागेवर अतिक्रमण करण्यास प्रोत्साहन देत असल्याने अनेक खुल्या प्लॉटवर अतिक्रमण झालेले असून त्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी आहे.आमचे विस्कटलेले संसार आणि उद्धवस्त झालेले गाव पुन्हा मांडून देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!

**डॉ.रमाकांत पाटील,**
कलदेव निंबाळा, ता.उमरगा, जिल्हा-धाराशिव

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५


# आधुनिक नवदुर्गा : डॉ.पूजा सुरेश सावंत






**कौतुक करताना प्राचार्या डॉ. कविता प्राशर आणि वडील सुरेश सावंत यांच्यासह पूजा**

***"माझी शरीराची उंची कमी असली म्हणून काय झाले...... मी मनाने खंबीर आहे......... आकाशाला गवसणी घालणाऱ्या पंखाचे बळ माझ्यात आहे.. व्यवस्थेला न घाबरता पुढे जाण्याची ताकद माझ्यात आहे. ज्ञान संपादन करण्यासाठी लागणारे कष्ट, जिद्द माझ्यात आहे यामुळेच मी आज इथपर्यंत येऊन पोहोचलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आयुष्य मला सतत प्रेरणा देते "***

***हे बोल आहे पूजा सावंत हिचे..................***

ही कहाणी आहे जालन्यातील कलेक्टरच्या बंगल्यामागील कामगार वसाहतीत राहणाऱ्या व अठरा विश्व दारिद्य असणाऱ्या कुटुंबातील पूजा सावंत हिची जी गरिबी आणि उंचीच्या अडथळ्यांना सामोरं गेली, पण संघर्षावर मात करून तिने स्वतःची ओळख निर्माण केली. कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना आपल्या जिद्दीच्या आणि ज्ञानाच्या बळावर शैक्षणिक क्षेत्रातील अत्युच्च पदवी तिने संपादन केली. आपल्या जडणघडणीचा संघर्षमय जीवन प्रवास पूजा सावंत उलगडून दाखवत होती. अगदी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व शिक्षकांची ती लाडकी होती. शिक्षकांनी तिला भरभरून दिले. ती ज्ञानाच्या क्षेत्रात कुठेही कमी पडली नाही पाहिजे यासाठी प्रयत्न केले. शिक्षकांचे हेच तर काम आहे ना ! समाजात अशी कितीतरी उदाहरणे आपणाला दिसून येतात ज्यांनी आपल्यातील विधायक बाजूचाच विचार करून त्याला पैलू पाडण्याचे कार्य केले आणि इतिहासाने त्याची नोंदही घेतली अशा व्यक्तीनी शारीरिक कमतरतेवर विजय मिळविला. हेलन केलर, स्टीफन हॉकिंग यासारख्या अनेकांची कहाणी आपणा सर्वांना माहित आहे. आपल्याकडे जिद्द, परिश्रम आणि व्यवस्थेसोबत झगडण्याची तयारी असेल तर आपणाला कोणीही थांबवू शकणार नाही. पूजाने ज्ञानाशी जोडलेलं नातं कधीही तोडले नाही किंबहुना याच क्षेत्रात ती पाय रोवून उभी आहे.

वनस्पतीशास्त्रात नुकतीच पीएचडी मिळविणाऱ्या पूजाने पीएचडी होण्यापूर्वीच प्राध्यापक पदाला आवश्यक असलेली नेट परीक्षाही उत्तीर्णही केली आहे. सध्या ती अनेक ठिकाणी प्राध्यापक पदाच्या मुलाखती देत आहे. तिला स्वतःच्या कर्तुत्वाने एक आदर्श निर्माण करायचं आहे. एक स्त्री म्हणून तिला कोणाचेही उपकार नको. माझ्यात ताकद आहे... मी लढणार.. हा आत्मविश्वास तिच्यात आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यासारखेच मला राहू द्या वेगळी ट्रीटमेंट देऊ नका अशी स्वतःहून सांगणारी पूजा सावंत ही अनेक विद्यार्थ्यांसमोर आदर्श आहे. समाजात आपण पाहतो थोडेसे जरी अपयश आले तरी लोक कोलमडतात, पराभूत होतात, परिस्थिती समोर हार मानतात मात्र पूजा सावंतने जिद्दीने प्रयत्न करून ज्ञानाच्या क्षेत्रात आपले नाव कमावले आहे. निर्मिकाने जसे दिले ते तीने स्वीकारले आहे. आपले आयुष्य कसं सुंदर बनवायचं यावरच तिने काम केलं आहे. तिच्या चिकाटीचे कौतुक तिचे शिक्षकही करतात.

पूजा सावंतने हिचे प्राथमिक शिक्षण जालन्यातील नगर परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण अक्रम फातेमा माध्यमिक कन्या पाठशाळा जालना येथे झाले. त्यानंतरचे उच्च शिक्षण बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात.. याच कालखंडात तिच्या आयुष्याला वेगळे वळण मिळाले. तिच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या. संशोधन आणि अध्यापन हे कार्यक्षेत्र तिने निवडले. उच्चतर पदव्युत्तर शिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात गेली... तिचे शिक्षक सांगतात अभ्यासक्रमाशी निगडित असलेला कोणताही प्रश्न तिला विचारा.... तिचे उत्तर तयार असे.... महाविद्यालयात ती एकही दिवस गैरहजर राहिली नाही. जीवन आनंदाने जगायचे. आपणाला दिलेली जबाबदारी आपण पूर्ण करायची. शिक्षकांनी सांगितलेले होमवर्क पूर्ण करायचे आणि मनाशी खुणगाठ बांधायची की आपण कुठेही कमी पडणार नाही... महाविद्यालयात असलेले विषयाचे प्रात्यक्षिक मन लावून करायचे. प्रात्यक्षिक करण्यासाठी महाविद्यालयाने तिला उभे राहण्यासाठी देऊ केलेला टेबल सुद्धा तिने नाकारला होता. तिला नेहमी वाटायचं की मला लोक का वेगळे समजतात.... वेगळी वागणूक का देतात. मला इतरांसारखंच वागवा.. अस ती म्हणायची !! महाविद्यालयाच्या अभ्यास सहलीत ती विविध वनस्पतीचे कलेक्शन करण्यासाठी ती पचमढी, कुलू, मनाली, महाबळेश्वर यासारख्या निसर्ग संपन्न प्रदेशात जाऊन आली.. पदवी वर्षात असताना पूजाने विविध विज्ञानविषयक परिषदेत सक्रिय सहभाग नोंदविला. राष्ट्रीय स्तरावरील एका स्पर्धेत तिला उत्कृष्ट संशोधन पेपर सादरीकरणाबाबतचा प्रथम क्रमांक मिळाला होता. ज्ञान संपादनासाठी तिची सतत धडपड असायची. आपण कुठेही कमी पडता कामा नये याची सतत काळजी घ्यायची.आपण जोपर्यंत इतरांपेक्षा काही वेगळे करत नाही तोपर्यंत आपली ओळख खऱ्या अर्थाने निर्माण होणार नाही याची जाणीव तिला आहे..

पीएचडीच्या अभ्यास विषयाचे महत्त्व सांगताना ती म्हणाली, माझे संशोधन हे सेरोपेजिया स्पेशीजवर आधारलेले आहे. या प्रजाती दुर्मिळ व औषधी गुणधर्माने महत्त्वाच्या आहेत. इन विट्रो मलटिपलिकेशनमूळे या वनस्पतींचं संवर्धन करता येतं आणि जैवविविधता टिकविता येते. त्यातील जैवरसायनिक घटकांमुळे औषधनिर्मितीसाठी नवे मार्ग उघडू शकतात. यामुळे समाजाला आरोग्य, औषधी उपयोग आणि शेतकऱ्यांना नवीन उत्पन्नाचे साधन मिळू शकते. घरातील कौटुंबिक माहिती विषयी ती म्हणाली, माझे वडील सुरेश सावंत हे कामगार असून, आई आशा ही गृहिणी आहे. माझे दोन भाऊ एक इंजिनिअर आणि दुसरा इलेक्ट्रिक मेकॅनिक आहे. सर्वसामान्य कुटुंबातून असूनही माझ्या आईवडिलांनी माझ्यावर विश्वास ठेवला आणि शिक्षण घेण्यासाठी मला पाठबळ दिलं. यामुळेच आज मी इथपर्यंत पोहोचले. तिच्या पाठीशी तिचे वडील खंबीरपणे उभे आहेत. ते सुद्धा परिस्थितीला डगमगले नाही. लेक म्हणून सांभाळताना प्रत्येक वडिलांना जे कष्ट होतात तेच कष्ट त्यांनीही घेतलेली आहे. मात्र त्यांनी कधीही कुरकुर केली नाही. आपल्या लेकीला ते सतत प्रेरणा देत राहतात. तशीच भूमिका तिच्या आईची सुद्धा राहिली आहे.

शिक्षण घेत असताना येणाऱ्या अडचणी बाबत ती म्हणाली, माझी उंची कमी असल्यामुळे काही वेळा अडचणी आल्या, पण मी कधीही त्यावर लक्ष केंद्रीत केलं नाही. मी माझ्या शिक्षणावर, मेहनतीवर आणि ज्ञानावर लक्ष केंद्रित केलं. मी अशा लोकांकडून प्रेरणा घेतली ज्यांचे जीवन माझ्यापेक्षा कठीण होते आणि त्यांनी धैर्याने संघर्ष केला. त्यामुळे मी नेहमी सकारात्मक राहून स्वतःच्या उद्दिष्टांसाठी मेहनत करते. आतापर्यंतच्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा क्षण याविषयी ती म्हणते माझा विद्यापीठ अनुदान आयोगाची नेट ज्युनियर फेलोशिप उत्तीर्णचा निकाल आल्यानंतर आणि पीचडी पूर्ण झाल्यानंतर माझ्या आई-वडिलांच्या डोळ्यात समाधान पाहिलं, आणि माझ्या कुटुंबासोबत हा क्षण माझ्यासाठी खूप आनंददायक होता. हे क्षण माझ्या सर्व कठोर मेहनतीसाठी मिळालेली खरी भेट आहे. अजून माझी सर्व स्वप्ने पूर्ण झालेली नाहीत, पण माझ्या प्रवासातील छोटे छोटे यश मला समाधान, नवी उर्मी देतात. माझा संघर्ष अजून सुरू आहे आणि मी प्रत्येक अनुभवातून शिकत पुढे जात आहे.

आयुष्यातील नेहमी बोचत राहणारी एखादी आठवण कोणती आहे हे विचारले असता ती सांगते मी खूप मेहनत करून इथपर्यंत पोहोचले, तरी माझी स्वप्ने अजूनही पूर्ण झाली नाहीत. मी अनेक ठिकाणी प्राध्यापकाच्या मुलाखतीसाठी गेले आणि नेहमी प्रामाणिकपणे स्वतःला मांडलं.पण आजच्या परिस्थितीत अनेक वेळा गुणवत्तेवर न्याय होत नाही, हे मी अनुभवले आहे. समाजातील राजकारण आणि भ्रष्टाचारामुळे अजून काही मला स्थिरता नाही मिळाली, पण मी संघर्ष करत राहणार आहे आणि प्रत्येक अनुभवातून शिकत पुढे जात आहे. तुझे आयुष्य सुंदर व आनंदी व्हावे यासाठी कोणी तुला मदत केली वा प्रोत्साहन दिले याबाबत ती म्हणते सर्वप्रथम मी माझ्या आई-वडिलांचे आभार मानू इच्छिते, ज्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला. माझे भाऊ, ज्यांनी नेहमी मला साथ दिली, त्यांचेही मी ऋणी आहे. तसेच बद्रीनारायण बारवाले कॉलेजचे माझे सर्व गुरुजन, ज्यांच्या प्रोत्साहनामुळे आणि कौतुकाच्या थापेमुळे मला पुढे जाण्याची खरी प्रेरणा मिळाली

भविष्यातील प्रकल्प कोणते आहेत यावर ती म्हणते, माझ्यासाठी अध्यापन ही फक्त नोकरी नाही, तर ती एक सेवा आहे. सामाजिक बांधिलकी आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्यात संशोधनाची आवड निर्माण करणे आणि समाजासाठी उपयुक्त काम करणारी पिढी तयार करणे हेच माझं स्वप्न आहे. त्यामुळे मी प्राध्यापक होण्याचं ध्येय ठेवलेलं आहे. सध्या ती **"बायो सायन्स विथ डॉ. पूजा "** या यू ट्यूब चॅनल वर वनस्पती शास्त्राच्या विविध पैलूविषयी महत्वपूर्ण माहिती प्रसारित करत आहे. इतरांना काय प्रेरणा देऊ शकाल? याविषयी तिला विचारले असता ती म्हणाली, माझ्या मते प्रत्येक मुलीने आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होणं खूप गरजेचं आहे. त्यामुळे स्वतःचे निर्णय घेण्याची ताकद मिळते आणि कुटुंबालाही आधार देता येतो. तसेच, कुणीही आपल्या शारीरिक कमतरतेकडे पाहून मागे हटायचं नसतं; खरं तर मेहनत, शिक्षण आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर आपण पुढे जाऊ शकतो.


**पूजा सावंत :**
**संपर्क** - 8857948108
**शब्दांकन : प्रा. प्रियदर्शन भवरे,**
**समाजशास्त्र विभाग,**
**बद्रीनारायण बारवाले**
**महाविद्यालय,**
**जालना.**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० सप्टेंबर २०२५

# प्रलयकारी भुकंपाला ३२ वर्ष पुर्ण









लातूर जिल्ह्यातील किल्लारी गावात ३० सप्टेंबर १९९३ रोजी मोठा भूकंप झाला होता. आज या भूकंपाला तीस वर्ष झाली आहेत. त्यावेळी संपूर्ण किल्लारी गाव साखर झोपेत असताना पहाटे ३ वाजून ५६ मिनिटांनी अचानक हादरे जाणवायला लागले. त्यानंतर पुढे काही वेळातच होत्याचं नव्हतं झालं. अनेक घरे जमीनदोस्त झाली, हजारो लोकं मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकले गेले. यामध्ये हजारो लोकांनी आपला जीव गमावला तर हजारो जनावरांचा मृत्यू देखील झाला...या घटनेचा उल्लेख आजही ऐकायला मिळाला की अंगावर शहारे उभे राहतात. तसेच या भूकंपानंतर हजारो मदतीचे हात धावून आले. यामधून देशाला आपत्ती व्यवस्थापनाचा आदर्श या भूकंपाच्या पुनर्वसनाने दाखवून दिला.

मात्र, हा किल्लारीचा भूकंप नेमका कसा झाला होता. हे अद्यापही काही लोकांना माहिती नाही. त्यामुळे आज या किल्लारी भूकंपाच्या घटनेला बत्तीस वर्ष जरी पूर्ण झाली असली तरी बत्तीस वर्षांपूर्वी नेमकं काय घडलं होतं? हे जाणून घेणे देखील महत्वाचे आहे.लातूर जिल्ह्यातील आणि सोलापूरच्या ईशान्येला ७० किमी अंतरावर असलेल्या किल्लारी गावाला ३० सप्टेंबर १९९३ रोजी पहाटे ३ वाजून ५६ मिनिटांनी अचानक हादरे जाणवले आणि त्यानंतर मोठा भूकंप झाला. हा भूकंप ६.४ रिश्टर स्केलचा होता. त्यावेळी या भूकंपात ७ हजार ९२८ लोकांनी आपला जीव गमावला होता. तर १६ हजार लोक जखमी झाले होते. तसेच १५ हजार ८५४ जनावरे मृत्यूमुखी पडली होती.

हा भूकंप केवळ किल्लारी पुरता मर्यादित नव्हता. तर लातूर आणि उस्मानाबादच्या ५२ गावांवर त्याचा प्रभाव पडला होता. याशिवाय ३० घरे देखील जमीनदोस्त झाली होती. तसेच १३ जिल्ह्यातील २ लाख ११ हजार घरांना तडे गेले होते. त्यावेळी लातूर जिल्ह्यातील औसा तालुका आणि उस्मानाबादमधील उमरगा तालुक्याला या भूकंपाचा सर्वाधिक फटका बसला होता. ज्यात लोकांनी आपलं सारं गमावले होते.दरम्यान, किल्लारी भूकंपाच्या वेळेस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे शरद पवार होते. त्यांना घटनेची माहिती मिळताच ते तात्काळ किल्लारी येथे दाखल झाले होते.

हा भूकंप घडल्यानंतर ५२ गावांत अनेक वेळेस शरद पवार जाऊन आले. त्यातील अनेक लोकांचा थेट शरद पवार यांच्याशी आजही संपर्क आहे. शरद पवार यांचे नियोजन आणि कामाच्या झपाट्यामुळे किल्लारीसह ५२ गाव या धक्क्यातून सावरली होती. दरवर्षी ३० सप्टेंबरला याठिकाणी भूकंपात बळी पडलेल्यांना मानवंदना दिली जाते.असं झालं पुनर्वसनकिल्लारी भूकंपावेळी बाधित झालेल्या गावांची गरज लक्षात घेऊन त्या गावांसाठी जमीन संपादित करण्यापासून सुरुवात झाली होती.

त्यावेळी ५२ गावांचे पुनर्वसन करण्याच्या या प्रकल्पावर १२०० कोटींचा खर्च होता. जागतिक बँकेची या प्रकल्पाच्या खर्चावर देखरेख होती. सरकारने लोकसहभाग प्राप्त करून हा प्रकल्प राबविणे अपेक्षित होते. पूर्ण गाव वसवणे अशा प्रकारचा देशातील हा पहिलाचा प्रकल्प होता. यात ५२ गावांचे स्थलातंर आणि पुर्नवसन २३ हजार नवीन घरे बांधणे, विविध संस्था आणि देणगीदार यांच्या सहकार्यातून साडेपाच हजार घरे बांधून घेणे, तीस हजाराच्या आसपास घरे आहेत तेथेच बांधून देणे किंवा दुरुस्त करून देणे, त्याचप्रमाणे १३ जिल्ह्यातील अडीच हजार गावातील दोन लाखांपेक्षा जास्त घराचे दुरुस्ती करणे ही कामे हातात घेण्यात आली.यानंतर प्रत्यक्षात काम सुरु झाल्यावर सर्वात प्रथम संपादित जमिनीवर रस्ते करण्यापासून सुरुवात झाली. मुख्य रस्त्याबरोबर अंतर्गत रस्ते, नाले, पिण्याच्या पाण्याची सोय, पाईपलाईन, वीज पुरवठा, खेळाचे मैदान, शाळेची इमारत, ग्रामपंचायत, आरोग्य, वाचनालय या साथीच्या इमारती यांची आखणी आणि बांधणी करत गावातील लोकांच्या नोंदीनुसार घराचे वाटप अशा अनेक टप्प्यातून हे पुनर्वसन पार पडले. मात्र ही सर्व घरे बांधताना पुन्हा भूकंप होईल अशी शक्यता लक्षात घेऊन भूकंप रोधक घरे बांधण्यात आली आहेत.आज जवळपास 32 वर्षानंतरही भुकंपाच्या आठवणी ताज्या असल्यासारखे वाटते. मन जुन्या आठवणीने भरुन येते.

सकंटाची मालिका काही मागे लागल्या सारखी पाठ सोडायला तयार नाही.कधी ओला दुष्काळ,कधी कोरडा दुष्काळ,आता तर नवीनच शब्द आला ढग फुटी या सर्व सकंटातुन मार्ग काढत आयुष्य जगणे हेच आपल्या हातात आहे. यातुन एकच सांगता येते विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी भुकंप थांबवता येत नाही,ढगफुटी रोखता येत नाही,वणवा विझवता येत नाही म्हणजेच निसर्गावर मात करता येत नाही. विज्ञानाचा व निसर्गाचा ताळमेळ घालुनच जिवनाचा गाडा चालवायचा आहे. हेच जिवन जगणे आहे असे म्हणावे लागेल.



**प्रा.डॉ. सुधीर पंचगल्ले**
श्री माधवराव पाटील
महाविद्यालय, मुरुम